# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रत्नागिरी जिल्हा)

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि भारत मौसम विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**फोन नं.: (०२३५८) २८२३८७** **ई-मेल: dpl.amfu@gmail.com**

**अंक ०३/२०२१** **दिनांक ०८/०१/२०२१** **कालावधी ५ दिवस**


| | | |
|---|---|---|
| **डॉ. प्रशांत बोडके,** | **डॉ. विजय मोरे,** | **डॉ. शितल यादव,** |
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२०४१३२५५ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |


| **मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०२/०१/२०२१ ते ०८/०१/२०२१)** | | | | | | | **हवामानाचे घटक** | **हवामान पूर्वानुमान (दिनांक ०९/०१/२०२१ सकाळी ८:३० पासून १३/०१/२०२१ सकाळी ८:३० वाजेपर्यंत)** | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (स्त्रोत: कृषि हवामान वेधशाळा, कृषि विद्या विभाग, कृषि महाविद्यालय, दापोली) | | | | | | | | (स्त्रोत: प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई) | | | | |
| **०२/०१** | **०३/०१** | **०४/०१** | **०५/०१** | **०६/०१** | **०७/०१** | **०८/०१** | | **०९/०१** | **१०/०१** | **११/०१** | **१२/०१** | **१३/०१** |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ५.२ | **पाऊस (मिमी)** | १२ | १० | ३ | ० | ० |
| ३३.६ | ३२.४ | ३१.४ | ३१.० | ३०.१ | ३२.५ | ३१.७ | **कमाल तापमान (अं.से)** | ३३ | ३२ | ३२ | ३३ | ३३ |
| १९.३ | १६.० | १८.५ | २०.० | १९.३ | १९.३ | २१.६ | **किमान तापमान (अं.से)** | २३ | २२ | २३ | २३ | २३ |
| ० | ४ | ८ | ८ | ८ | ८ | ८ | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ |
| ९८ | ९२ | ९८ | ९४ | ९६ | ९३ | ९६ | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ८३ | ८४ | ७८ | ७२ | ७२ |
| ५८ | ५४ | ६५ | ६७ | ६१ | ५९ | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ५० | ५४ | ४६ | ४५ | ४२ |
| २.६ | २.८ | २.० | २.६ | २.२ | ३.१ | ३.४ | **वाऱ्याचा वेग(किमी/तास)** | ४ | ४ | ५ | ६ | ५ |
| शांत | शांत | शांत | शांत | शांत | शांत | शांत | **वाऱ्याची दिशा** | ई.पू. | ई.पू. | ई.पू. | पू. | ई.पू. |

| **पाऊस (मिमी) मागील आठवडयातील** | **पाऊस (मिमी) १/१/२०२१ पासून आजपर्यंत** | **पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा** |
|---|---|---|
| **५.२** | **५.२** | **४१४५.४** |

## हवामान सारांश /ईशारा

| | |
|---|---|
| **हवामान अंदाज** | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार रत्नागिरी जिल्ह्यात दिनांक **९ ते ११ जानेवारी, २०२१ दरम्यान तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पाऊसाची** शक्यता वर्तवण्यात आली असून **दिनांक ९ ते १३ जानेवारी, २०२१ दरम्यान पाऊसाळी वातावरण** राहील. |
| **इशारा** | **दिनांक ८ आणि ९ जानेवारी, २०२१ दरम्यान रत्नागिरी जिल्ह्यातील तुरळक ठिकाणी विजेचा कडकडाटासह गडगडाटी पाऊसाचा इशारा देण्यात आला आहे.** |

## हवामान अंदाजावर आधारित कृषि सल्ला

| **पिक** | **अवस्था** | **कृषि सल्ला** |
|---|---|---|
| **सामान्य सल्ला** | - | • हवामान अंदाजानुसार दिनांक ११ जानेवारी, २०२१ पर्यंत हलक्या पाऊसाची शक्यता असल्याने तसेच झालेल्या पाऊसामुळे पाणी साठून राहणाऱ्या क्षेत्रातील भाजीपाला पिकामधील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी तसेच नवीन फळबाग लागवड, रोपवाटिका व भाजीपाला सिंचन कालावधी पुढे ढकलावा. |
| **विशेष सल्ला** | - | • हवामान अंदाजानुसार दिनांक ११ जानेवारी, २०२१ पर्यंत हलक्या पाऊसाची शक्यता असल्याने उन्हाळी भाजीपाला पेरणी पुढे ढकलावी. |
| **आंबा** | पालवी ते मोहोर अवस्था | • हवामान अंदाजानुसार दिनांक ११ जानेवारी, २०२१ पर्यंत हलक्या पाऊसाची शक्यता असून पुढील पाचही दिवस ढगाळ वातावरण संभवत असल्याने तसेच मागील काही दिवसांपासून ढगाळ पाऊसाळी वातावरण राहिल्याने आंबा पालवी आणि मोहोरावर **करपा रोगाचा** प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने **प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून दिनांक ११ जानेवारी, २०२१ नंतर करपा रोगाच्या नियंत्रणासाठी** कार्बेन्डॅझिम १२% + मन्कोझेब ६३% या संयुक्त बुरशीनाशकाची १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

| | | |
|---|---|---|
| | | • हवामान अंदाजानुसार हलक्या पाऊसाची शक्यता असून ढगाळ वातावरण संभवत असल्याने **बोंगे फुटण्याच्या अवस्थेत** असलेल्या आंब्यावर **तुडतुड्यांचा, फुलकिडीचा आणि भुरी रोगाचा** प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने कीड व रोगाच्या नियंत्रणासाठी लॅम्बडासायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. + हेक्झाकोनाझोल ५% प्रवाही ५ मि.ली. किंवा पाण्यात विरघळणारे ८० टक्के गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पाउसाचा अंदाज घेवून फवारणी करावी तसेच **मोहोर फुटलेल्या** आंबा बागेमध्ये मोहोरावर **तुडतुडे, मिजमाशी इ.किडींचा तसेच भुरी रोगाचा** प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने **मोहोर फुलण्यापूर्वी** तुडतुडे आणि मिजमाशीच्या नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रीड १७.८ टक्के प्रवाही ३ मि.ली. प्रति १० लिटर पाणी आणि भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी ५ टक्के हेक्झाकोनॅझोल ५ मि. ली. किंवा पाण्यात विरघळणारे ८० टक्के गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. (**टीप:** मोहोर नुकताच फुलत असताना ते फलधारणा होईपर्यंत किटकनाशकाची फवारणी टाळावी. फवारणी करणे गरजेची असल्यास बागेतील परागीकरण करणाऱ्या कीटकांवर होणारा परिणाम टाळण्यासाठी परागीकरणाचा कालावधी वगळून सकाळी ९.०० ते १२.०० किंवा सायंकाळी ३.०० वाजल्यानंतर फवारणी करावी.) या अगोदर फवारणी घेतली असल्यास किड व रोगाच्या प्रादुर्भावाकडे झाडाचे निरीक्षण करावे आणि प्रादुर्भाव दिसून आल्यास उपाय योजना कराव्यात.<br>• शिफारशीत दिलेली कीटकनाशकाची/बुरशीनाशकाची मात्रा ही मनुष्यबळाने वापरण्यात येणाऱ्या पंपासाठी आहे. |
| **काजू** | मोहोर ते फळधारणा | • हवामान अंदाजानुसार दिनांक ११ जानेवारी, २०२१ पर्यंत हलक्या पाऊसाची शक्यता असून पुढील पाचही दिवस ढगाळ वातावरण संभवत असल्याने तसेच मागील काही दिवसांपासून ढगाळ पाऊसाळी वातावरण राहिल्याने काजूच्या पालवीवर करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने **प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून दिनांक ११ जानेवारी, २०२१ नंतर करपा रोगाच्या नियंत्रणासाठी** १ टक्के बोर्डोमिश्रणाची किंवा कार्बेन्डॅझिम १२% + मन्कोझेब ६३% या संयुक्त बुरशीनाशकाची १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>• हवामान अंदाजानुसार दिनांक ११ जानेवारी, २०२१ पर्यंत हलक्या पाऊसाची शक्यता असून पुढील पाचही दिवस ढगाळ वातावरण संभवत असल्याने तसेच मागील काही दिवसांपासून ढगाळ पाऊसाळी वातावरण राहिल्याने **मोहोर अवस्थेत** असलेल्या काजू पिकावर ढेकण्या व फुलकिडींच्या वाढीसाठी हवामान अनुकूल दिसत असल्याने या किडींच्या बंदोबस्तासाठी मोहोर फुटण्याच्या वेळी प्रोफेनोफॉस ५० टक्के प्रवाही १० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी तसेच **फळधारणा** झालेल्या काजूच्या फळांवर ढेकण्या व फुलकिडीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने किडींच्या नियंत्रणासाठी लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. किंवा असिटामिप्रीड २० टक्के एसपी ५ ग्रॅम प्रति १० लि. पाण्यात मिसळून पाउसाचा अंदाज घेवून फवारणी करावी. (सदर कीटकनाशकास लेबल क्लेम नाहीत). या अगोदर फवारणी घेतली असल्यास किड व रोगाच्या प्रादुर्भावाकडे झाडाचे निरीक्षण करावे आणि प्रादुर्भाव दिसून आल्यास उपाय योजना कराव्यात.<br>• **टीप:** ढेकण्या किड सकाळी आणि संध्याकाळच्या वेळेस सक्रीय असल्याने किडीच्या प्रभावी नियंत्रणासाठी फवारणी शक्यतो सकाळी १०.०० पूर्वी किंवा सायंकाळी ४.०० वाजल्यानंतर करावी. या अगोदर फवारणी घेतली असल्यास किड व रोगाच्या प्रादुर्भावाकडे झाडाचे निरीक्षण करावे आणि प्रादुर्भाव दिसून आल्यास उपाय योजना कराव्यात. |
| **वाल, चवळी** | वाढीची ते फुलोरा अवस्था | • हवामान अंदाजानुसार दिनांक ११ जानेवारी, २०२१ पर्यंत हलक्या पाऊसाची शक्यता असून पुढील पाचही दिवस ढगाळ वातावरण संभवत असल्याने वाल, चवळी पिकामध्ये **मावा, तुडतुडे इ. रसशोषक किडीचा** प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने किडी कोवळ्या शेंड्यावर पानाच्या खालच्या भागातील रस शोषून घेतात त्यामुळे झाडाची वाढ खुंटते तसेच किडीने बाहेर टाकलेल्या मधासारख्या चिकट द्रावणामुळे पानांजवळ काळ्या बुरशीची वाढ दिसून येते. |

| | | |
|---|---|---|
| | | मावाचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास नियंत्रणासाठी डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १२ मि. ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. आवश्यकता वाटल्यास दुसरी फवारणी १५ दिवसांनंतर करावी. |
| **वांगी, टोमेटो** | फुलधारणा ते फळधारणा | • वांगी, टोमेटो पिकातील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी तसेच पुढचा ताण बसे पर्यंत पिकास पाणी देवू नये.<br>• हवामान अंदाजानुसार दिनांक ११ जानेवारी, २०२१ पर्यंत हलक्या पाऊसाची शक्यता असून तसेच झालेल्या पाऊसामुळे योग्य निचरा न होणाऱ्या शेतामध्ये वांगी, टोमेटो पिकावर **मर रोगाचा** प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने **प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून दिनांक ११ जानेवारी, २०२१ नंतर** कॉपर ऑक्सिक्लोराईड २.५ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात द्रावण तयार करून रोपांच्या बुंध्याशी आळवणी करावी. |
| **मिरची, वांगी, टोमेटो** | फुलधारणा ते फळधारणा | • हवामान अंदाजानुसार दिनांक ११ जानेवारी, २०२१ पर्यंत हलक्या पाऊसाची शक्यता असून पुढील पाचही दिवस ढगाळ वातावरण संभवत असल्याने तसेच मागील काही दिवसांपासून ढगाळ पाऊसाळी वातावरण राहिल्याने वांगी, मिरची, टोमेटो पिकावर **करपा रोगाचा** प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी मॅन्कोझेब २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पाउसाचा अंदाज घेवून फवारणी करावी. |
| **कोबी** | वाढीची अवस्था | • हवामान अंदाजानुसार दिनांक ११ जानेवारी, २०२१ पर्यंत हलक्या पाऊसाची शक्यता असून पुढील पाचही दिवस ढगाळ वातावरण संभवत असल्याने तसेच मागील काही दिवसांपासून ढगाळ पाऊसाळी वातावरण राहिल्याने कोबी पिकावर **करपा रोगाचा** प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता आहे. प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी कॉपर ऑक्सीक्लोराइड २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पाउसाचा अंदाज घेवून फवारणी करावी. |
| **कलिंगड** | फळधारणा | • हवामान अंदाजानुसार दिनांक ११ जानेवारी, २०२१ पर्यंत हलक्या पाऊसाची शक्यता असून तसेच झालेल्या पाऊसामुळे योग्य निचरा न होणाऱ्या कलिंगड पिकामध्ये पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी तसेच फळे ओल्या मातीच्या संपर्कात येणार नाहीत अशी व्यवस्था करावी. |
| **वेलवर्गीय भाजीपाला** | फुलधारणा ते फळधारणा | • हवामान अंदाजानुसार दिनांक ११ जानेवारी, २०२१ पर्यंत हलक्या पाऊसाची शक्यता असून पुढील पाचही दिवस ढगाळ वातावरण संभवत असल्याने तसेच मागील काही दिवसांपासून ढगाळ पाऊसाळी वातावरण राहिल्याने काकडी, पडवळ, दुधीभोपळा, तांबडा भोपळा, दोडका, कारली, कलिंगड इ. वेलवर्गीय भाजीपाला पिकांमध्ये **केवडा रोगाचा तसेच भुरी रोगाचा** प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने केवडा रोगाच्या प्रादुर्भावामुळे पानांवर पिवळसर तपकिरी रंगाचे ठिपके दिसून येतात केवडा रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी रोगग्रस्त पाने काढून नष्ट करावीत व मॅन्कोझेब २५ ग्रॅम किंवा कॉपर ऑक्झीक्लोराईड २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून १० ते १५ दिवसांच्या अंतराने दोन फवारण्या पाउसाचा अंदाज घेवून कराव्यात तसेच भुरी रोगाच्या प्रादुर्भावामुळे पानांवर दोन्ही बाजूनी पांढऱ्या भुकटीच्या स्वरूपातील बुरशीची वाढ दिसून येते. भुरी प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी कार्बेन्डेझीम १० ग्रॅम किंवा हेक्झाकोनॅझोल ५ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. करून १० ते १५ दिवसांच्या अंतराने दोन फवारण्या पाउसाचा अंदाज घेवून कराव्यात. |
| सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली.<br>अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा. | | |